दिपमाळी दिवाळी अंक २००९

# 'गंमत-जंमत' मध्ये रमणारी चैताली माजगांवकर-भंडारी

- डॉ. मधुरा कोरान्ने

बागेत नुकतीच उमललेली जाई-जुई-सायलीची फुलं बघितली, लहान मुलांचं निष्पाप, निरागस हसू बघितलं की, मन कसं प्रसन्न होतं. किंवा एखाद्याचं बोलणं अत्यंत प्रामाणिकपणानं, मनापासून, विनम्रपणाचं त्यामध्ये 'मी'पणाचा लवलेशही नाही... अशांच्या सहवासात आपण आलो, तर आपलंही मन समाधानानं भरून पावतं... असाच काहीसा अनुभव चैताली माजगांवकर-भंडारी हिच्या समवेत गप्पा मारताना आला...

'गंमत-जंमत' हा नावाप्रमाणे मनोरंजनपर 'गेम शो'चा कार्यक्रम चैताली सादर करते. अशा प्रकारचा कार्यक्रम सादर करणारी तरुण पिढीतील ती यशस्वी कलाकार आहे. आज या कार्यक्रमाचे ५०० च्या वर प्रयोग झाले आहेत.

निवेदन, सूत्रसंचालन, गंमत-जंमत असा चैतालीचा प्रवास कसा झाला? हे कुतूहल मनात होतचं! चैतालीच्या मते, 'याची बीजे लहानपणापासूनच रुजली होती' कोणतीही कला-दैवी देणगीच असते. पण त्याचबरोबर त्या कलेचा वारसा मागच्या पिढीकडून मिळाला, तर सोन्याला सुगंधच! असा सोन्याचा सुगंध वडील आणि काकाच्या वारशाच्या रूपाने चैतालीला मिळाला आहे. त्यादृष्टीने ती स्वतःला भाग्यवान समजते.

लहानपणापासून चैतालीच्या घरातील वातावरण तिला पोषकच असे मिळाले. तिचे वडील सुरेन्द्र माजगांवकर आणि तिचे काका जादूगार एम. सुनील कुमार हे दोघे मिळून नकला आणि जादूचे प्रयोग असा एकत्रित कार्यक्रम करीत असत. या कार्यक्रमामध्ये पडदे ओढायला, कार्यक्रमाच्या वेळी जी काही मदत लागेल त्याला सगळे घरचेच. आत्या, काकू, आईसारखे कलाकार असत. त्या कार्यक्रमामधून वयाच्या तिसऱ्या वर्षी चैतालीने विनोद सांगायला सुरुवात केली. त्यामुळे स्टेजची भीती कधी वाटली नाही. घरातले हे प्रोत्साहनपर वातावरणच विशेषतः आईचे सहकार्य पुढचे कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये प्रेरणादायी ठरल्याचे चैताली सांगते.

आज चैतालीने मनोरंजनाची वेगळी वाट निवडलेली आहे. 'गंमत-जंमत' ह्या वडिलांनी सुरू केलेल्या कार्यक्रमात चैतालीने वयाच्या बाराव्या वर्षापासून खऱ्या अर्थाने भाग घ्यायला सुरुवात केली. वेगवेगळे किस्से, नकला अशा अनेक गोष्टींनी या कार्यक्रमाची रंगत दिवसेंदिवस वाढतच जाताना दिसते. म्हणूनच आज 'गंमत-जंमत' हा पिता आणि कन्येचा एकत्रित कार्यक्रम एकमेव द्विपात्री कार्यक्रम ठरला आहे. याचे श्रेय अर्थातच वडील माणसांबरोबर चैतालीने या कार्यक्रमामध्ये झोकून देऊन काम करण्याकडेही जाते.

म्हणूनच या क्षेत्रातच करीअर करायचं असा ध्यास चैतालीने घेतला. बारावी झाल्यावर पुणे विद्यापीठामध्ये ललित कला केंद्रात



तिने नाट्यशास्त्राच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. त्यावेळी तिने नाटकांमधून भूमिकाही केल्या. त्याबरोबर पार्श्वसंगीत, संहिता लेखन, दिग्दर्शन अशा विविध भूमिका तिने साकारल्या.

कोणतंही यश एका दिवसात मिळत नसतं! त्यासाठी एक झपाटलेपण असणं आवश्यक असतं! त्यादृष्टीने चैतालीची वाटचाल सुरू झाली. म्हणूनच नाट्यशास्त्राची पदवी मिळविल्यावर या क्षेत्रात संधी मिळवण्यासाठी तिने मुंबईला जायचा निर्णय घेतला. तिच्या या निर्णयाला घरच्यांचा पूर्ण पाठिंबा होता. एकतर घरच्यांचा तिच्यावर असणारा विश्वास, त्यांनी दिलेले प्रोत्साहन हे सगळ्यात महत्त्वाचे होते, हे आजही ती मान्य करते.

मुंबईला आल्यानंतर मात्र तिच्या संघर्षाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. वास्तव जीवनाची तिला कल्पना आली. निर्मिति-